| MHNG020032812021 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | २१.०८.२०२१ |
| | नोंदणी तारीख | : | २१.०८.२०२१ |
| | निकाल तारीख | : | ०८.०७.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०४ : १० : १७ |

<u>१३वे सह दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर) तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांचे न्यायालय</u>

**(पिठासीन अधिकारी - श्रीकांत पां. आडे)**

<u>वारस अर्ज क्रमांक : २७०/२०२१</u> <u>निशाणी क्र. ८१</u>

| | | |
|---|---|---|
| १. | श्री प्रविण श्रावण मुरकुटे<br>वय : ३१ वर्षे, व्यवसाय : ड्रायव्हर | |
| २. | श्री दिपक श्रावण मुरकुटे<br>वय : २८ वर्षे, व्यवसाय : मजुरी<br>अर्जदार क्र. १ व २ दोन्ही राह. शिव नगर, वार्ड क्र. ४, तारसा रोड, कन्हान, तहसिल पारशिवनी, जिल्हा नागपूर | |
| ३. | सौ. योगिता हेमंत केकतपूरे<br>वय : ३१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,<br>रा. प्लॉट क्र. १, गोपाल कृष्णा नगर, नागपूर. | ..... अर्जदार |

// विरूध्द //

| | |
|---|---|
| श्रीमती छाया श्रावण मुरकुटे<br>वय : ५० वर्षे, व्यवसाय : गृहिणी,<br>रा. निमतलाई, तहसिल सावनेर,<br>जिल्हा नागपूर. | ..... गैरअर्जदार |

| | | |
|---|---|---|
| अर्जदारांतर्फे विद्वान वकील | : | श्री बी.एस. राजुरकर |
| गैरअर्जदारातर्फे विद्वान वकील | : | श्री एस.एन.काझी |

**<u>न्या य नि र्ण य</u>**
**(दिनांक ८ जुलै, २०२६)**

**१.** अर्जदार यांनी सदरचा अर्ज भारतीय उत्तराधिकारी अधिनियमाचे कलम ३७२ अंतर्गत मयत श्रावण वारलुजी मुरकुटे यांचे ते वारस आहेत असा वारस दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ प्रविण व अर्जदार क्र. २ हे मयत श्रावण वारलुजी मुरकुटे यांचे मुले असुन अर्जदार क्र. ३ ही मुलगी आहे. मयत श्रावण वारलुजी मुरकुटे यांचे लग्न मयत चंद्रकला हिचेसोबत झाले होते व त्यांना अर्जदार क्र. १ ते ३ ही मुले आहेत. श्रावण वारलुजी मुरकुटे वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड, सावनेर येथे काम करत होते. ते दि. ०४.०९.२०१९ रोजी मयत झालेले आहे. तसेच आई चंद्रकला ही दि.१८.१०.१९९९ रोजी मयत झालेली आहे. त्याच्या मृत्युनंतर अर्जदार हेच केवळ त्यांचे वारस असुन श्रावणच्या मृत्युनंतर त्यांच्या पेंशन, ग्रॅज्युटी, डिपार्टमेंटल इन्शुरन्स, पी.पी.एफ वर त्यांचा अधिकार आहे. अर्जदारांच्या नावे दिवाणी न्यायालय, कामठी यांनी एम. जे. सी. क्र. ७७/१९ प्रमाणे दि.११.१२.२०१९ रोजी वारस प्रमाणपत्र जारी केलेले आहे. तसेच अर्जदार हे श्रावण मुरकुटेचे वारस असल्यासंबंधी सदरचे प्रमाणपत्र डब्ल्यु. सी. एल. अधिका-याकडे दाखल केले असुन सुध्दा त्यांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे. त्यामुळे सदर चल संपत्ती संबंधी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी हा अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, जेव्हा अर्जदार हे डब्ल्यु. सी. एल. ऑफीस येथे मयत यांचे नावावर असलेली रक्कम मागण्यासाठी गेले असता त्यांना असे कळाले की गैरअर्जदार हिने ती मयत श्रावण मुरकुटे याची पत्नी असल्याचा दावा केलेला आहे. त्यामुळे वारस प्रमाणपत्राची मागणी केली.

**४.** अर्ज दाखल झाल्यानंतर नियमाप्रमाणे नोटीस देवुन हरकती मागविण्यात आल्या. तसेच गैरअर्जदारास नोटीस काढण्यात आली.

**५.** गैरअर्जदाराने नि. क्र. १९ वर म्हणणे दाखल कले. गैरअर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, तिचे व श्रावण मुरकुटे यांचे लग्न सन २००५ साली मौजे निमतलई, तह. सावनेर येथे जातीरिवाजाप्रमाणे झाले. लग्नानंतर गैरअर्जदार ही मयत श्रावण मुरकुटे सोबत नांदायला गेली. तसेच त्यांच्या लग्नासंबंधातुन दि. ०३.०७.२००७ रोजी मूल जन्माला आले. परंतु ते दुस-या दिवशी मयत झाले. तसेच गैरअर्जदार मयत श्रावण मुरकुटे हिच्याकडे नांदत असताना श्रावण मुरकुटे हा तिचा मानसिक व शारीरिक छळ करीत होता. गैरअर्जदाराच्या नावे आधार कार्ड, राशन कार्ड तसेच क्रिंस हॉस्पीटल येथे मुलगा जन्मला याचे प्रमाणपत्र आहे.

**तोंडी व कागदोपत्री पुरावा**

**६.** अर्जदार क्र.१ यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.२३ वर दाखल केले आहेत. तसेच अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ श्रीकांत वासुदेव मस्के यांचे शपथपत्र नि. ४१ वर दाखल केलेले आहेत. त्याप्रमाणे अर्जदारांनी खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवलेली आहे.

| **अ. क्र.** | **कागपत्रांचे विवरण** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | अर्जदाराच्या आईचे व वडीलांचे मृत्यु प्रमाणपत्र. | **२४ व २५** |
| २. | डब्ल्यु. सी.एल. ने अर्जदार क्र. १ च्या नावे पाठविलेले पत्र. | **२६** |
| ३. | डब्ल्यु. सी.एल. यांनी सहाय्यक श्रम आयुक्त (केंद्रिय) यांना दिलेले पत्र. | **२७** |
| ४. | तहसील कार्यालय पारशिवनी (पुरवठा विभाग) यांनी दिलेले प्रमाणपत्र. | **२८** |
| ५. | कि.फौज.अर्ज क्र.२५/२००९ झालेल्या निकालाची व अंतरिम पोटगी अर्जावर झालेल्या आदेशाची प्रमाणित प्रत. | **२९ व ३०** |
| ६. | गैरअर्जदाराचा पुरावा व अतिरिक्त पुराव्याच्या प्रती. | **३१ व ३२** |

| | | |
|---|---|---|
| ७. | मृतक श्रावण यांच्या पगार स्लीपची प्रमाणित प्रत. | **३३** |
| ८. | मृतक श्रावण यांच्या आयकार्डची प्रमाणित प्रत. | **३४** |
| ९. | वारस प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. | **३५** |
| १०. | सर्व अर्जदारांचे आधार ओळखपत्राच्या प्रमाणित प्रती. | **एकत्रित ३६** |
| ११. | दोन राशन कार्डच्या प्रमाणित प्रती. | **३७ व ३८** |

**७.** गैरअर्जदार यांनी पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ४५ दाखल केलेले आहे. तसेच साक्षीदार क्र.२ किसन गणपतीजी कड्ु यांचे शपथपत्र नि.६४ वर दाखल केलेले आहे. त्याप्रमाणे गैरअर्जदारांने खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवलेली आहे.

| **अ. क्र.** | **कागपत्रांचे विवरण** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शासन गॅझेट ची पडताळीत प्रत | **५२** |
| २. | राशन कार्डची पडताळीत प्रत. | **५३** |
| ३. | ओळखपत्राची पडताळीत प्रत. | **५४** |
| ४. | क्रिम्स हॉस्पीटलनी दिलेले प्रमाणपत्राची पडताळीत प्रत. | **५५** |
| ५. | भारत निवडणुक आयोग ओळखपत्राची पडताळीत प्रत. | **५६** |

**युक्तीवाद :-**

**८.** अर्जदारांच्या वकीलानी नि. ७४ वर लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. तसेच थोडक्यात तोंडी युक्तीवाद असा की, गैरअर्जदार ही श्रावणची पत्नी असल्यासंबंधी कोणताही पुरावा सिध्द केलेला नाही. तसेच गैरअर्जदाराने प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी सावनेर न्यायालयात कि.फौ.अर्ज क्र. २५/२००९ मध्ये खावटीसाठी टाकलेला अर्ज गैरअर्जदार ही श्रावण मुरकुटे याची पत्नी नसल्यामुळे रद्द केलेला आहे. तसेच सदरचा आदेशाविरूध्द अपील दाखल करण्यात आले व अपीलामध्ये पुन्हा खटला चालविण्याचा आदेश देण्यात आले. परंतु दरम्यानच्या काळात श्रावण मुरकुटे मयत झाल्यामुळे तो अबेट झाला. त्यामुळे गैरअर्जदार ही श्रावण मुरकुटेची पत्नी असल्याचे सिध्द झालेले नाही. त्याचप्रमाणे

गैरअर्जदाराच्या पुराव्यात गैरअर्जदाराचे लग्न एकनाथ क्षीरसागर सोबत झाल्याचे व त्यापासुन कोणताही घटस्फोट न झाल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे गैरअर्जदार ही श्रावण मुरकुटेची पत्नी असल्याचे सिध्द होत नाही.

**९.** गैरअर्जदाराच्या वकीलांनी गैरअर्जदार ही श्रावण मुरकुटे याची पत्नी असल्याबाबत खालील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवलेली आहे.

1. ***Dhannulal & Ors Vs. Ganeshram And Anr*** reported in ***2015 AIR SCW 2839***
2. ***Chandrabhagabai Ganpati Karwar Died Vs. Sambhaji Narhari Karwar Died His Lrs.*** reported in ***2007(6) MhLJ 471***
3. ***Ningu Vithu Bamane And Ors. Vs. Sadashiv Ningu Bamane And Ors.*** reported in ***AIR 1987 BOM 27***

**१०.** अर्जदार व गैरअर्जदार यांचे कथन लक्षात घेता माझे पुर्वाधिकारी यांनी नि.क्र. ३९ वर इंग्रजीमध्ये मुद्दे निश्चीत केले. त्यावर मी माझे कारणमिमांसेसह मुद्दयांच्या मराठी अनुवादासह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतात का की, ते मयत श्रावण वारलुजी मुरकुटे यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत ?<br><br>Do the applicants prove that they are the only legal heirs of deceased Shrawan Warluji Murkute ? | : | **...होय**<br><br>**...Yes** |
| २. | गैरअर्जदार सिध्द करते का की, ती श्रावण वारलुजी मुरकुटे यांची कायदेशीर लग्नाची पत्नी आहे ?<br><br>Does the non-applicant prove that, she is legally wedded wife of Shrawan Warluji Murkute ? | : | **...नाही**<br><br>**...No** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | अर्जदार हे विनंतीप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहे का ?<br>Are the applicants entitled for getting Succession Certificate as prayed ? | : | **...होय**<br>**...Yes** |
| ४. | काय आदेश ?<br>What order ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे.**<br>**As per final order.** |

**-:: <u>का र ण मी मां सा</u> ::-**

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ :-</u>** कारणमिमांसेची पुन:वृत्ती टाळण्यासाठी मुद्दे एकत्रीतरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

**११.** सर्वात प्रथम मी नमुद करू इच्छीतो की, मयत श्रावण मुरकुटे हा डब्यलु. सी. एल .कंपनीत कामावर होता व त्यांना अर्जदार क्र. १ ते ३ ही मुले आहेत यासंबंधी वाद नाही, तर केवळ गैरअर्जदार ही श्रावण मुरकुटेची कायदेशीर पत्नी नसल्यासंबंधी उजर दिसुन येते. अर्जदाराने त्यासंबंधी गैरअर्जदाराने मयत श्रावण मुरकुटे याच्या विरोधात फौ.प्र.सं. १२५ अंर्तगत सावनेर येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात किरकोळ फौ. अर्ज क्र. २५/२००९ मध्ये झालेला न्यायनिर्णय नि.५२, दि. ०७.०७.२०१२ वर भिस्त ठेवलेली आहे. प्रथम श्रेणी न्यायालयाने गैरअर्जदार छाया ही श्रावण मुरकुटेची कायदेशीर पत्नी असल्याचे सिध्द झाले नसल्याचा निष्कर्ष नोंदविलेला आहे व तिचा अर्ज खारीज केला होता. परंतु सदर न्यायनिर्णयाविरूध्द गैरअर्जदार छाया हिने अपील दाखल केलेली होती. सदर अपील, क्रिमीनल रिव्हीजन क्र. ४१४/२०१२ दाखल केली होती व त्या अपीलमध्ये मा. अपील न्यायालयाने सदरचा आदेश रद्द करून न्यायालयाने पुन्हा सदर अर्जावर विचार करण्यासाठी रिमांड केला होता.

**१२.** त्यानुसार अर्ज रिमांड झाल्यानंतर दरम्यानच्या काळात श्रावण मुरकुटे हा मयत झाला. त्यामुळे फौ. कि.अर्ज क्र. २५/२००९ हा श्रावण मुरकुटे मयत झाल्यामुळे दि. २४.०२.२०२१ रोजी अबेट करण्यात आला. सदर अर्ज अबेट झाल्यानंतर गैरअर्जदार छाया ही श्रावण मुरकुटेची कायदेशीर पत्नी असल्यासंबंधी कोणताही दावा गैरअर्जदार हिने दाखल केलेला नाही. विशेषत: जेव्हा अर्जदार हे गैरअर्जदार छाया ही श्रावणची मुरकुटेची पत्नी नसल्याचे प्रथम पासुनच नाकारतात. तसेच मयत श्रावण मुरकुटेने सुध्दा गैरअर्जदार छाया त्याची कायदेशीर पत्नी असल्याचे नाकारलेले आहे.

**१३.** अशा परीस्थीतीत सदर अर्जाचे संक्षीप्त स्वरूप पाहता छाया ही श्रावण मुरकुटेची कायदेशीर पत्नी असल्याबाबत सदर संक्षीप्त प्रकरणामध्ये तसे ठरवण्यास पर्याप्त न्यायक्षेत्राधिकार नाही.

**१४.** तथापी, त्यासंबंधी मुद्दा निश्चित असल्यामुळे गैरअर्जदार छाया चा उलटतपास पाहला असता तिला एकनाथ क्षीरसागर याचे सोबत लग्न झाल्याची सुचना दिली आहे. तसेच एकनाथ क्षीरसागरसोबत सोडचिठ्ठी झाली नाही ही सुचना छाया अमान्य करते. त्यामुळे छाया हिचे एकनाथ क्षीरसागर सोबत लग्न झाल्यासंबंधीचा अर्थबोध होतो. तसेच गैरअर्जदाराचा सा.क्र. २ किसन कडु याची साक्ष पाहता तो लहानपनापासुन गैरअर्जदार छाया हिला ओळखतो, तसेच शपथपत्रामध्ये छाया हिचे लग्न एकनाथ क्षीरसागर याच्यासोबत झाले होते व दि. ०५.०४.२००४ रोजी तिची पहील्या पतीपासुन आपसी सोडचिठ्ठी झाली होती असे कथन करताना दिसुन येते. त्यामुळे एकनाथ क्षीरसागर व छाया हिचा कोणत्याही न्यायालयामार्फत कायदेशीर घटस्फोट झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे गैरअर्जदाराची सुचना की छाया हिचे एकनाथ क्षीरसागरसोबत कधीही सोडचिठ्ठी झाली नाही याबाबीस बळ मिळते. तसेच या ठिकाणी नमुद करू इच्छीतो की, गैरअर्जदार हिचा साक्षीदार स्वत:च छाया हिचे एकनाथ क्षीरसागर सोबत लग्न झाल्याचे कथन करीत असताना छायाचे पुर्वाश्रमीचे पती याच्यासोबत

घटस्फोट झाला हे सिध्द करण्याची जबाबदारी गैरअर्जदारावर येवुन पडते. परंतु छाया हिचे पहील्या पतीपासुन कायदेशीर घटस्फोट झाला असे उपरोक्त कारणांस्तव म्हणता येणार नाही. त्यामुळे वादाकरीता श्रावण मुरकुटे यांनी छायासोबत लग्न केले असे मानल्यास हिंदु विवाह कायदा कलम ५(i) अंर्तगत ते निरस्त ठरते. मुलत: त्या लग्नला कोणतीही मान्यता नाही. त्यामुळे गैरअर्जदार छाया ही मयत श्रावण मुरकुटे याची कायदेशीर पत्नी आहे असे या ठिकाणी तरी म्हणता येणार नाही.

**१५.** अर्जदारांनी सदरचा अर्ज श्रावण मुरकुटे याच्या पेंशन, ग्रॅज्युटी, डिपार्टमेंटल इन्शुरन्स, पी.पी.एफ च्या वारस प्रमाणपत्रासाठी दाखल केला असुन अर्जदाराच्या नावे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी यांनी एम.जे.सी. क्र.७७/२०१९ मध्ये वारस प्रमाणपत्र जारी केल्याचे दिसुन येते व त्याची प्रत नि. ३५ वर आहे. तसेच सदर प्रमाणपत्र अद्याप कुठेही आव्हानीत झालेले नाही. सदर प्रमाणपत्राविरूध्द गैरअर्जदार छाया हिने कोणताही आक्षेप नोंदविला नाही. त्यामुळे नि. ३५ च्या अनुषंगाने अर्जदार हे मयत श्रावण मुरकुटे याचे कायदेशीर वारस आहेत असे म्हणावे लागेल. तसेच मयत श्रावण मुरकुटेच्या चल संपत्ती संबंधी वारस प्रमाणपत्र भेटण्यास ते हक्कदार आहेत.

**१६.** गैरअर्जदारांनी भिस्त ठेवलेले न्यायनिर्णय ***Dhannulal & Ors Vs. Ganeshram And Anr*** पाहता सदर न्यायनिर्णय हे मृत्युपत्रासंबंधी आहे. तसेच ***Chandrabhagabai Ganpati Karwar Died Vs. Sambhaji Narhari Karwar Died His Lrs*** मधील न्यायनिर्णय हा दिवाणी खटल्यासंबंधीचा आहे ज्यामध्ये गैरअर्जदार चंद्रभागाबाई हिचे पुर्वीचे लग्न हे सिध्द झाले नाही. परंतु हाती असलेल्या खटल्यामध्ये गैरअर्जदार छाया हिचे एकनाथ क्षीरसागरसोबत पुर्वीचे लग्न झाले होते अशी केस घेवुन आली आहे. त्यामुळे हाती असलेली वस्तुस्थीती उपरोक्त खटलयाशी भिन्न आहे. तसेच ***Ningu Vithu Bamane And Ors. Vs. Sadashiv Ningu Bamane And Ors*** मध्ये

सुध्दा लग्न व लग्नासंबंधातुन जन्मलेल्या मुलासंबंधीच्या गृहीतीकासंबंधी आहे व हाती असलेल्या खटल्यामध्ये गैरअर्जदार छाया ही स्वत: तिचे पुर्वीचे लग्न झाल्यासंबंधीचे कथन घेवुन आल्यामुळे सदर लग्नासंबंधी कोणतेही गृहीतक ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांनी भिस्त ठेवलेले न्यायनिर्णय हे हाती असलेल्या खटलयाशी भिन्न असल्यामुळे गैरअर्जदारास उपयोगी नाही. तसेच सदरचे निवाडे हे इंडियनकानुन वेबसाईटमधुन काढण्यात आलेले आहेत.

**१७.** अर्जदाराकडे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी यांनी ते वारस असल्यासंबंधी प्रमाणपत्र आहे. ते कोणत्याही न्यायालयात आव्हानीत झालेले नाही. तसेच सदर संक्षीप्त प्रकरणामध्ये गैरअर्जदार ही मयत श्रावण मुरकुटे याची कायदेशीर पत्नी असल्याबाबतचा पुरावा पर्याप्त नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ हे भारतीय वारस कायदयाचे कलम ३७३(३) पाहता प्राथमीक दृष्टया वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरतात. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायोचित आहे. करिता उपरोक्त कारणास्तव मी मुद्दा क्र.१ ते ३ यास त्यानुसार निष्कर्ष देवून मुद्दा क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

**२.** अर्जदार क्र.१ प्रविण श्रावण मुरकुटे, अर्जदार क्र. २ दिपक श्रावण मुरकुटे व अर्जदार क्र. ३ सौ. योगिता हेमंत केकतपूरे हे मयत श्रावण वारलुजी मुरकुटे यांचे कायदेशीर वारस असून त्यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे ए.एल.सी मधील रक्कम रू.८,५६,१३१/-, सी. एम. पी. एफ. मधील रक्कम रू. २५,७३,४१३/-, वार्षीक बोनस रू.२७,९६४/- व इतर रजा रोखीकरण रक्कम रू.८१,८९०/- अशी एकुण रक्कम रू. ३५,३९,३९८/- (रक्कम रूपये पस्तीस लाख एकोणचाळीस हजार तिनशे अठ्ठयानऊ फक्त) जमा रकमा मिळणेस याद्वारे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

**३.** अर्जदार यांना आदेशित करणेत येते की त्यांनी भारतीय उत्तराधिकारी अधिनियमाचे कलम ३७९ अन्वये आवश्यक असणारी संपुर्ण कोर्ट फि भरावी.

**४.** अर्जदार यांनी भारतीय उत्तराधिकारी अधिनियमाचे कलम ३७५ अन्वये विहीत नमुन्यात बंधपत्र सादर करावे.

**५.** वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक कोर्ट फि भरल्यानंतर अर्जदार क्र.१ ते ३ यांची नावे दिवाणी नियमावली मधील परिशिष्ट-८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे आणि सदर प्रमाणपत्राचे खाली दिवाणी नियमावली मधील परिच्छेद ३१२ मधील मजकूर नमुद करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

स्वा/
(एस.पी. आडे )
नागपूर
१३वे सह दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर व
दिनांक : ०८.०७.२०२६
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,नागपूर.

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 08.07.2026 |
| Judgment dictated on | : | 08.07.2026 |
| Transcription Ready on | : | 08.07.2026 |
| Judgment checked and signed off | : | 08.07.2026 |

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव : आर. एस. डवरे (ग्रेड - ३)